ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 7 | MARCH - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# तुळजापूरातील प्रमुख मठ



**डॉ. बालाजी गंगावणे**
**(इतिहास विभाग, प्रमुख) माऊली महाविद्यालय, वडाळा.**

## प्रस्तावना -

धार्मिक तीर्थक्षेत्रांच्या स्थळी मठ आणि मंदिरांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते. या सर्व धार्मिक स्थानांचा संबंध हा स्थानिक धार्मिक रूढी परंपरा आणि पंथाच्या आचार विचारांशी असतो. महाराष्ट्रात मध्ययुगाच्या प्रारंभी महानुभाव, वीरशैव इ. पंथही आपले मठ प्रस्थापित करून धर्म कल्पनांचा प्रसार करत असत. पुढे वारकरी पंथाच्या उदयानंतर त्यांनीही विविध मठांच्या स्थापनेत प्रेरणा दिली. येथे तुळजापूर येथील मठांचा अभ्यास करावयाचा आहे. धार्मिक तीर्थक्षेत्री धर्मगुरु, धर्मप्रचारक यांच्या निवासासाठी मठांची आवयकता असते. तुळजापूर येथील उपलब्ध मठापैकी अरण्यगोवर्धन मठ, महंत गरीबनाथ मठ, हमरोजी बुवा मठ, वाकोजी बुवांचा मठ, महंत भारती बुवांचा मठ असे पाच प्रमुख मठ आहेत.

सत्यपुरुषांचे मठ हे तेथे उपासना आणि साधना करण्याचे स्थळ होय. अन्नछत्र भक्त सेवा व नंदादीप तेवत ठेवण्याची परंपरा ही गतकाळापासून अद्यापही चालू आहे.

मठ आणि मंदिराची सत्पुरुषांचे संबंध असल्यामुळे त्यांनी या भूमीत जे महत्कार्य केले त्यांचे आकलन करून या मठांचा इतिहास आपण अधिक चांगल्याप्रकारे स्पष्ट करू शकतो. शिवाय या मठाभोवती निगडीत असलेल्या परंपरांचा आणि इतिहासाचा शोध घेऊन त्यांचे सांस्कृतिक जीवनातील मौलिक स्थान आपण नव्याने प्रकाशात आणू शकतो. या अनुषंगाने तुळजापूर येथील मठांचा अभ्यास हा महत्त्वाचा ठरतो.

## मठ कल्पनेचा उदय

मठ ही संस्था भारतीय समाजास प्राचीन काळापासून प्रचलित असली तरी या संस्थेचा गतकालीन प्रवास पाहता मठांचा संबंध हा धार्मिक चळवळीशी असल्याचे दिसून येते. मठांचे कार्य व अंगभूत उद्दिष्ट हे धर्म मतांचा पाठपुरावा करणाऱ्या व्यक्तींची सोय करण्यासाठी केली जाते. असे मठांच्या उद्देशाबाबत विश्वकोषात म्हटले आहे, “धार्मिक उपासनेत जीवन व्यथित करणे, गुढवाद आणि संन्यास यांच्याकडे वळण्याची मानवाची नैसर्गिक प्रवृत्ती मठ संस्थेला जन्म देते. मठामध्ये धर्मप्रसार करण्यासाठी साधू, बैरागी व संन्यासी हे निश्चित ध्येय डोळ्यांसमोर ठेवून कार्यरत असतात. त्यांची व्यवस्था ही सार्वजनिक दान आणि भक्तांच्या समर्पणातून केली जाते. आधुनिक साम्यवादी देशातील कम्युनिस्ट प्रमाणे मठही कार्यरत असतात.

## तुळजापुरातील प्रमुख मठ —

### १. अरण्य बुवाचा मठ :

तुळजापूर शहराच्या उत्तरेला अतिशय निसर्गरम्य असा हा मठ बालाघाटच्या कड्यावर आहे. येथील शांतता भाविकाच्या मनाला शांतीचा अनुभव घडविणारी आहे. त्यामुळे या मठाचे अध्यात्मिक सामर्थ्य अनन्यसाधारण आहे. पंपाड म्हणतात, “या मठाचे मूळस्थान हरद्वार येथे आहे. त्याची एक शाखा तुळजापूर श्री हरिद्वार येथील अरण्य गोवर्धन मठांचे शिष्य श्रीमंत तुकी जनार्दन अरण्य यांनी मठाची स्थापना केली.

या मठाची स्थापना १२०० वर्षांपूर्वी झाली असावी असा स्थानिक सेवा करणाऱ्यांचा अंदाज आहे. हा काळ राष्ट्रकूट घराण्याचा असावा. पंपाड यांच्या मते सुमारे १२०० वर्षांपूर्वी म्हणजे नवव्या शतकात झाली असावी असे म्हणतात. या मठाचे स्थापत्य हे उत्तर राष्ट्रकूटकालीन स्थापत्याचा नमूना म्हणता येईल. प्रारंभी मठपतींच्या काही पिढ्या ब्राह्मण होत्या. परंतु काही पिढ्यांपासून इथले मठपती भावसार क्षत्रिय (शिंदे) समाजाचे आहेत. तथापि हा बदल केव्हा झाला हे मात्र निश्चित नोंदविता येत नाही. आरंभीच्या मध्ययुगात यादव काळानंतर हे स्थित्यंतर झाले असावे.

### २. गरिबनाथ बुवांचा मठ :

हा मठ नाथपंथाच्या परंपरेतील आहे. या मठाचे संस्थापक गरीबनाथ यांच्याबद्दल अशी दंतकथा आहे. पंपाड यांनी ती दिली आहे, "गरिबनाथ बुवा देवीचे महान भक्त व सिध्द पुरुष होऊन गेले ते त्यांच्या तपोबलाने प्रत्यक्ष तुळजाभवानीशी बोलत असत. अशा या सत्पुरुषाचे अध्यात्मिक कार्य या मठाच्या रूपाने अमर झाले आहे. या मठाचे स्थान तुळजापूर येथील भागात आहे.

या गरीबनाथ बुवाना काशीला जावे, कार्य तीर्थाचे दर्शन घ्यावे असे वाटू लागल्याने आपले इच्छा श्री तुळजाभवानीला त्यांनी बोलून दाखविली. परंतु श्री तुळजाभवानीने परवानगीने नाकारली तरीही काशीला जाण्याचा आग्रह धरला. याबाबत पंपाड म्हणतात, "काशीला जाऊन व माझे स्मरण करून गंगेच्या पाण्यात एक लिंबू, नारळ व काठी सोड. देवीची ही आज्ञा घेऊन गरीबनाथ बुवा तीर्थाटन करीत काशीला गेले. तेथे दर्शन घेऊन पूजा केली. नंतर देवीने सांगितल्याप्रमाणे लिंबू, नारळ व काठी गंगेच्या पाण्यात सोडले. परत तीर्थाचे दर्शन घ्यावे म्हणून ते मंदिरातील गायमुख तीर्थात हातपाय धुणेकरीता गेले तेव्हा गायमुखातून पडत असलेले पाणी ओंजळीत घेत असता त्यांच्या हातात काशीतील गंगेच्या पाण्यात सोडले लिंबू, नारळ व काठी आली.

हा चमत्कार आधुनिक अभ्यासक मान्य करतील असे नाही, परंतु तथापि यावरून एवढे मात्र स्पष्ट होते की, तुळजापूरचे गोमुख तीर्थ हे काशी एवढे पवित्र होय. यावेळी श्रीदेवीने संतप्त होऊन म्हटले, "येथून पुढे तू आणि तुझ्या परंपरेतील मठपतींनी माझ्या दर्शनास येऊ नये, एवढेच नव्हे तर मठाचा उंबरही ओलांडू नये. "

गरीबनाथांचा मठ आणि त्यातील सत्पुरुषांची ही कथा देवीच्या निस्सीम भक्तीचा संदेश देते. त्यावरून उपासनेतील त्यांचे स्थान स्पष्ट होते. मठाधिपती आणि देवी यांच्यातील परस्पर आदरभाव हा निश्चितच मोलाचा ठरतो. गरीबनाथांची. ही दृढतर निष्ठा आणि देवीवरील त्यांचा अपार श्रध्दाभाव प्रकट करणारी ही कथा प्रथमच प्रकाशात आणली आहे.

### ३. वाकोजी बुवांचा मठ :

हा मठ शहरांच्या दक्षिण भागात आहे. पंपाड म्हणतात, " तुळजाभवानी मंदिराच्या दक्षिण बाजूस हा मठ आहे. मंदिरातील शिवाजी महाराज महाद्वारातून बाहेर निघताच डाव्या बाजूने गेल्यास या मठाकडे जाण्याचा रस्ता आहे. मठाचे बांधकाम प्राचीन आहे. २५ ह्या मठाचे वेगळेपण तत्कालीन परंपरेस अनुसरून आहे. त्यात मुख्य मठ व

सभागृह तसेच निवास व्यवस्थाही आहे. हा मठ नियामक संस्थेचे कार्य करतो. भवानी मंदिराची किल्ली याच मठाच्या अधिपतीकडे असते. मठातील व्यवस्थेवर सुनियोजित अशा कार्य पध्दतीचा समावेश आहे. मंदिराचे सुसूत्रीकरण या मठातून होते. देवीच्या स्नानसाठी लागणारे पाणी यांनीच पुरवावे लागते. यावरून या मठाची महती लक्षात येते. भवानी मंदिरात दिवाबत्तीची आणि रोशनाईची व्यवस्था करणे आणि सकाळची चरणतीर्थ पूजा व रात्रीची प्रक्षाळपूजा करणे हे नित्योपासनेतील कामे वाकोबुवाच्या मठाकडे आहेत. या सेवेसाठी या मठास सरकारकडून ठराविक रक्कम मिळते. या मठात भवानीची सुंदर मर्ती आहे. याचा अर्थ असा की, मठ आणि मंदिराची व्यवस्था यांचे एक सुसुत्र रूप येथे पाहता येते.

### ४. हमरोजी बुवा मठ :

हा मठ शहराच्या पश्चिमेस आहे. या बाबत पाटोळे म्हणतात, " तुळजाभवानी मातेच्या मुख्य मंदिराच्या मागच्या बाजूस छत्रपती शिवाजी महाराज महाद्वार आहे. या दक्षिण महाद्वारामधूनच हमरोजी बुवा मठाकडे जाण्याचा रस्ता आहे. हा रस्ता महत्त्वाचा असून मठाचे प्रवेशद्वारही लक्षणीय आहे. इतर मठाप्रमाणे या मठाची वैशिष्ट्यपूर्ण रचना लक्षणीय आहे. श्रीदेवी मंदिराच्या पश्चिमेला हा मठ आहे. याला हमरोजी बुवांचा मठ असेही म्हटले जाते. जवळपास ६०० वर्षांपूर्वीचा हा मठ मानला जातो. श्रीदेवीच्या मूर्तीला चंदनाचा गंध पुरविण्याचे कार्य..... पण यासाठी मंदिर समितीकडून या मठाला प्रतिवर्षी केवळ रु. ५००/ दिले जातात. पण वाढती महागाई तसेच चंदनाचा अभाव यामुळे हा निधी अतिशय अपुरा असल्याची खंत या मठाधिपतींनी व्यक्त केली. या मठाच्या प्रमुखावर श्रीदेवीला गंध, फुल- पान व अलंकार चढविण्याची जबाबदारी आहे.

हमरोजी बुवांच्या मठाकडे देवीचा जबादारखाना सांभाळण्याचे , अत्यंत जबाबदारीचे / जोखमीचे काम चालत आले आहे. देवीच्या जमादारखान्यात तिच्या रत्नखचित सुवर्णालंकाराचा समावेश आहे. त्यामुळे या मठाच्या प्रमुखांना देवीस अलंकार चढविताना आणि ते विशिष्ट वेळी उतरविताना जातीने सावधपणे उभे राहावे लागते.

### ५. महंत भारतीबुवांचा मठ :

“हा मठ महत्त्वाचा असून शहराच्या पश्चिमेस आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाद्वारातून खाली उतरून अर्धा-पाऊण किलोमीटरचे अंतर गेल्यावर भारतीबुवाचा मठ आहे. तुळजाभवानी देवीची सारीपाट खेळण्याची जागा या भारतीबुवांचा मठातच आहे. '

यावरून या मठाची महती लक्षात येते. सारीपाट व त्यातील देवीचे व्यूहरचनात्मक स्थान याचा विचार करता पुजाऱ्यांची भावना महत्त्वाची वाटते. देवीशी बोलणारे पुजारी हे एक अद्भूत घटना मानली जाते. मठ संस्थापक रणछोड भारती यांच्याबरोबर भवानी रोज रात्री सारीपाट खेळण्यासाठी येत असे आणि पहाटे नित्योपासना सुरू होण्याच्या वेळी तिला पश्चिम दारातून हाक मारून मंदिरातील गर्भगृहात न्यावे लागत असे. आजही ही प्रथा निष्ठापूर्वक पाळली जाते. भवानीच्या संदर्भातली ही दंतकथा लक्षणीय आहे.

### निष्कर्ष -

या मठांचे व्यवस्थापन कार्य अभ्यासले असता पुढील निष्कर्ष लक्षात येतात.

1) निस्सीम भक्ती व अपारश्रध्दा ही बाब मठांच्या कार्याचा प्रमुख आधार आहे.
2) सामुदायिक जबाबदारीची जाणीव ही मठाच्या कार्याचा पाया होय.
3) कामांची विभागणी व विशेषीकरण यामुळे मठाचे कार्य सुलभपणे चालते.

4) मठाधिपती हे या व्यवस्थेत शिखरावर असतात.
5) मठातील सेवाकार्य हे अचूक, नेमके आणि तत्परतेवर अवलंबून असते. या सेवा कार्यातून त्याग, सेवा आणि समर्पण ही मूल्ये रुजविली जातात.
6) देवीच्या नित्य उपासनेमध्ये आखून दिलेली कामे पार पाडणे हा प्रमुख आधार होय. त्यातून समन्वय आणि सुसंगती या पैलूंचे दर्शन घडते.
7) मठामधील नेमून दिलेला वर्ग हा सेवाकरी म्हणून ओळखला जातो या सेवेस मोल नसते.
8) देवीच्या आशीर्वादातून सेवेकरी वर्गास जे समाधान मिळते ते अमोल व अपूर्व असते.
9) मठाधिपती आणि त्यांचे कनिष्ठ सेवक हे क्रमाक्रमाने उच्चपदावर पोहचतात.
10) मठांवर रक्षण-संवर्धन हे कार्य प्रत्येकजण कर्तव्य भावनेने करत असतो. मठात सत्पुरुषांची गादी असते. काही मठात या देवीभक्तांची समाधी स्थळेही आहेत. त्यांचे नैमित्तिक पूजा व उत्सवप्रसंगी काही विशिष्ट कर्तव्ये असतात. शिवाय मठाशी निगडीत सेवाकरी आणि भक्त यांच्या निवासाची सोयही केलेली असते. त्यांच्या या सहभागामुळे हे मठ एका अर्थाने निष्ठा व भक्तीचा अपूर्व संगम बनलेले आहेत.

## समारोप

विश्वास किंवा श्रध्दा सामान्य व्यवहार ज्ञान यामुळे ज्ञानाच्या कक्षा रूंदावत नाहीत. त्यासाठी कोणत्याही घटनेची चिकित्सा करणे गरजेचे असते. त्यामागे काही नियम असतात, सुसंगती असतात. मठाचा शास्त्रीय अभ्यास करतान त्या मागील सामाजिक जीवन, धार्मिक तत्वज्ञान व श्रध्दांचे आकलन करुन त्यांची उपयुक्तता शास्त्रीयपणे अभ्यासता येऊ शकते. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत शोधनिबंधात केलेली मीमांसा अर्थपूर्ण असून त्याआधारे आपणास एक नवी मांडणी करता येते.

तीर्थक्षेत्राभोवती असलेले आकर्षण लक्षात घेऊन मठ, मंदिर व तीर्थांची उभारणी केली जाते व त्यांना परस्परपूरक रूप दिले जाते. रूढी, परंपरा आणि नैतीक संकेतांचे पालन करण्यासाठी भाविकांच्या मनावर प्रभाव टाकण्याचे कार्य या सांस्कृतिक प्रतिकांनी केले आहे. त्यांची संस्कारक्षमता ही वर्तमान युगात अद्यापही कमी झालेली नाही. हेच या अवशेषांचे खरे रूप आहे.

## संदर्भसुची –

1. पाटोळे अरविंद — श्री. तुळजाभवानी महात्म्य,
2. पोहनेरकर न.शे. — श्री. तुळजाभवानी
3. ढेरे रा.चि. — श्री. तुळजाभवानी
4. पंपाड तुळजाराम — श्री. तुळजाभवानी
5. देवळे शंभूराव — तुळजापूरची भवानी
6. जोशी महादेवशास्त्री — तीर्थरुप महाराष्ट्र
7. तांदळे — श्री. देवीची साडेतीन शक्तीपीठे
8. कोंढारे जालींदर — पी.एच.डी. शोधप्रबंधक